# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, जालना




**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, संभाजी उद्यान जवळ, जुना जालना**

संपर्क क्रमांक-02482-220117 ई-मेल – sdorjalna@gmail.com


उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना
तहसील कार्यालय, जालना
तहसील कार्यालय, बदनापूर

# जालना उपविभागांबाबत थोडक्यात

- जालना जिल्हयाची निर्मीती 1 मे 1981 रोजी करण्यात आली. त्या वेळी जिल्हयात दोन उपविभाग होते. 1) उपविभाग जालना 2) उपविभाग परतूर जालना उपविभागामध्ये एकूण चार तालुके होते 1) जालना 2) बदनापूर 3)भोकरदन 4) जाफ्राबाद व परतूर उपविभागामध्ये चार तालुके होते. 1)परतूर 2) मंठा 3) अंबड 4) घनसावंगी.
- दिनांक 15 ऑगस्ट 2013 पासून भोकरदन व अंबड असे दोन नविन उपविभाग शासनाने निर्माण केले. त्यामध्ये पुर्वीच्या जालना उपविभागातील दोन तालुके 1)भोकरदन 2)जाफ्राबाद हे भोकरदन उपविभागात समाविष्ट करण्यात आले तर जालना व बदनापूर हे तालुके जालना उपविभागात समाविष्ट आहेत. याच प्रमाणे पुर्वीच्या परतूर उपविभागातील अंबड व घनसावंगी या दोन तालुक्यांचा अंबड उपवि भागात तर परतूर व मंठा या तालुक्यांचा परतूर उपवि भागात समावेश झाला आहे.
- असे जालना जिल्हयात आता एकूण चार उपविभाग आहेत.
- 1) जालना 2) भोकरदन 3) परतूर 4) अंबड

# जालना शहराबाबत

- जालना शहरामध्ये जालना अ वर्ग नगर पालीका असून शहरामध्ये एकूण 14 प्रभाग असून एकूण वार्डची संख्या 51 आहे.
- नगर पालीकांतर्गत शहराला वेढलेला दळणवळणासाठी व वाहतुकीसाठी अत्यंत सोयीस्कर असा पर्यायी रस्ता आहे. ज्याला रिंग रोड असे म्हणतात. रिंग रोड हा शहराला गोल रिंग प्रमाणेच असल्यामुळे जड वाहने व इतर वाहतूकीसाठी हा वळण रस्ता अत्यंत सोयीस्कर आहे. शहरामधून रेल्वे लाईन जाते. रिंग रोड वर 2 व शहरामधील 1 अशा तीन रेल्वे उडान पुलांमुळे वाहतूक सुरळीत असते.
- नगर पालीकांतर्गत करमणूकीसाठी शहराच्या पश्चीमेस संभाजी उद्यान आहे. उद्यानाच्या शेजारी सुंदर असा मोती तलाव आहे.
- जालना शहर हे उद्योगांसाठी प्रसिध्द असून स्टिल उद्योग व बि-बियाणांच्या कंपन्या मोठया प्रमाणात आहेत. जालना शहराची औद्योगीक वसाहत ही शहराच्या पश्चीमेस आहे.

# जालना उपविभागातील तलाठी महसूल मंडळ, सजा व गावांची माहिती

| अ. क्र. | उपविभाग | तालुका | महसूल मंडळ संख्या | तलाठी सजा संख्या | गावांची संख्या | ग्रामपंचाय तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | जालना | जालना | 8 | 46<br>03 (अकृषिक)<br>01 (पुनर्वसन) | 151 | 121 |
| 02 | | बदनापूर | 5 | 30 | 91 | 80 |
| एकूण उपविभाग | | | 13 | 80 | 242 | 201 |

# जालना उपविभागातील तालुके व मंडळे

| उपविभाग | तालुक्याचे नाव | मंडळ |
|---|---|---|
| जालना | जालना | जालना शहर |
| जालना | जालना | जालना ग्रामीण |
| जालना | जालना | नेर |
| जालना | जालना | सेवली |
| जालना | जालना | वाघ्रुळ जहांगीर |
| जालना | जालना | पाचनवडगाव |
| जालना | जालना | रामनगर |
| जालना | जालना | विरेगाव |
| जालना | बदनापूर | बदनापूर |
| जालना | बदनापूर | दाभाडी |
| जालना | बदनापूर | रोषणगाव |
| जालना | बदनापूर | शेलगाव |
| जालना | बदनापूर | बावणेपांगरी |

# 2011 च्या जनगणनेनुसार जालना उपविभागातील लोकसंख्या

| तालुका | ग्रामीण / नागरी | पुरूष | स्त्रीया | एकूण |
|---|---|---|---|---|
| जालना | ग्रामीण | 121295 | 112229 | 233524 |
| | नागरी | 147714 | 137635 | 285349 |
| | एकूण | 269009 | 249864 | 518873 |
| बदनापूर | ग्रामीण | 80076 | 73949 | 154025 |
| | नागरी | -- | -- | -- |
| | एकूण | 80076 | 73949 | 154025 |
| **एकूण उपविभाग, जालना** | | **349085** | **323813** | **672898** |